अपील क्रमांक ३५८८/२०१४


# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

'बचत भवन', लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद - ४३१००१
दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३५२५४४/२३५२१३३ फॅक्स क्र. ०२४०-२३५२५४४
आयोगाचे संकेतस्थळ : www.sic.maharashtra.gov.in


जा. क्र. २०१५/रामाआ/अपील/सीआर-३५८८ 2519

दिनांक 9/5/15

प्रति,

१. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी
२. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत, जि.परभणी
३. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ताडकळस, ता.जि.परभणी
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पार्थी, जि.परभणी
५. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सोनपेठ, जि.परभणी
६. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पालम, जि.परभणी
७. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेड, जि.परभणी
८. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा, जि.परभणी
९. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलु, जि.परभणी
१० सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी.
११ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी

अपिलार्थी

जन अपिलीय अधिकारी

विषय : केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेल्या अपील क्रमांक २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५८८ वरील निर्णय दिनांक १५-०१-२०१५

उपरोक्त विषयी मा. राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांनी सुनावणी घेतलेल्या व्दितीय अपिलावरील निर्णयाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

कक्ष अधिकारी
राज्य माहिती आयोग
खंडपीठ औरंगाबाद

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी : अपिलार्थी

विरुध्द

जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी. : उत्तरवादी

१ अपील क्रमांक : २०१४/रामाआ/अपील/सिआर/३५८८

२ सुनावणीची तारीख : दि. १५-०१-२०१५

३ आज रोजीची उपस्थिती

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१ | अपिलार्थी - श्री. व्ही. एम. मस्के, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी - श्री. बी. एम. कदम, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | अपिलार्थी - श्री. पी. डी. जोशी, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ताडकळस, ता.जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.४ | अपिलार्थी - श्री. रामराव ..., सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पाथरी, जि. परभणी | : | उपस्थित |
| ३.५ | अपिलार्थी - श्री. एल. जी. घोबाळे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सोनपेठ, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.६ | अपिलार्थी - श्री. ए. एन. जाधव, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पालम, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.७ | अपिलार्थी - श्री. डी. बी. धापसे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेड, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.८ | अपिलार्थी - श्री. सी. टी. मुसळे, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.९ | अपिलार्थी - श्री. पी. डी. पौळ, सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, जि.परभणी | : | उपस्थित |
| ३.१० | अपिलार्थी, सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी | | |
| ३.११ | अपिलार्थी यांचे विधीज्ञ, श्री.आर.जे.निर्मल | : | उपस्थित |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| ३.१२ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.१३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एम.यु.यादव, कार्यालय अधीक्षक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०७-२०१४ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०७-२०१४ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२०१४ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-०९-२०१४ |
| ८ | राज्य माहिती आयोगांकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०१४ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी व सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी अनुपस्थित आहेत. दोनही बाजुचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, मूळ अर्जदार श्री.ज्ञानोबा प्रभाकर यांनी जन माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे दि.१०.०७.२०१४ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व बाजार समिती आवारात बांधलेले व्यापारी संकुलातील गाळे किती, कुणास वाटप झाले, वाटप पध्दत व प्लॉट भाडेकरु किती, आडत दुकानांची संख्या किती या सर्व बाबतची माहिती द्यावी"

(मूळ अर्जदार श्री.कदम यांच्या माहिती अर्जातील मजकूर जसास तसा घेतलेला आहे)

जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन) संलग्न जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी मूळ अर्जदार यांच्या दि.१०.०७.२०१४ रोजीच्या माहिती अर्जास दि.११.०७.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती संबंधित कृषि उत्तन्न बाजार समितीशी संबंधित असल्यामुळे सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी यांच्याकडे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार वर्ग केलेला आहे. तथापि संबंधित सर्व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी कृषि उत्पन्न बाजार समितीस माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे मूळ अर्जदार यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे दि.०१.०९.२०१४ रोजी प्रथम अपील केलेले आहे. मूळ अर्जदार यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०९.२०१४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, मूळ अर्जदार श्री.कदम यांचे प्रथम अपील मान्य करुन सर्व संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना पंधरा दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आदेशित केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थी (सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत / ताडकळस / पूर्णा / परभणी / पाथरी / पालम / सोनपेठ / सेलू / गंगाखेड / जिंतूर, जि.परभणी) यांनी विचाराधीन व्दितीय अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या विधिज्ञांनी आयोगासमोर कथन केले की, मूळ अर्जदार श्री.कदम माहितीचा अर्ज जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी या कार्यालयाकडे सादर केलेला या अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती संबंधित जन माहिती अधि तथा सहायक निबंधक (प्रशासन) संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था परभणी यांनी उप करुन देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी असे न करता मूळ अर्जदार यांचा माहितीसाठीचा सर्व १० कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांकडे वर्ग केलेला आहे. तथापि कृषि उत्पन्न बा समितीस शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नसल्यामुळे उत्पन्न बाजार समितीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होत ना त्यामुळे सर्व १० कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली किंवा ती उपलब्ध करुन देणे त्यांच्यावर बंधनकारक नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनि १९६० मधील तरतुदीनुसार अस्तित्वात येणाऱ्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनि २००५ लागू होत नसल्याबाबतचे निर्णय मा.उच्च न्यायालय व राज्य माहिती आयोगाने वेळोवे दिलेले आहेत. त्यामुळे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द आयोगा दाखल केलेले विचाराधीन व्दितीय अपील मान्य करण्यात यावे अशी विनंती आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कथन केले की, मूळ अर्ज यांना आवश्यक असलेली माहिती संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडे उपलब्ध असणारी आ त्यामुळे अशी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित कृषि उत् बाजार समितीच्या सचिवांना आदेशित केलेले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी मूळ अर्जदार श्री.कदम यांनी त्यां माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जि उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्याकडे सादर केलेला आहे. त्यामुळे जन माहि अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभ यांनी मूळ अर्जदार श्री.कदम यांचा माहितीसाठीच्या अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालया उपलब्ध आहे ती प्रथमतः मूळ अर्जदार श्री.कदम यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते अ आयोगाचे मत आहे. तथापि त्यांनी असे न करता मूळ अर्जदार यांचा माहितीसाठीचा अर्ज रा संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडे वर्ग केलेला आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही तथापि सहकारी संस्थांना शासनाचे कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त हो नसल्यामुळे अशा प्रकारच्या सहकारी संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतु लागू होत नाहीत असे निर्णय यापूर्वी मा.उच्च न्यायालय तसेच राज्य माहिती आयोगाने वेळोवे दिलेले आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक (प्रशासन), संलग्न जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, परभणी यांनी ज्या दहा कृषि उत्पन्न बाजार समितीकडे अपिलार्थी यां माहितीचा अर्ज वर्ग केलेला आहे त्या सर्व संबंधित दहा कृषि उत्पन्न बाजार समितीस शासना कोणतेही अनुदान प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नाही. त्यामुळे अशा कृषि उत्पन्न बाजा समित्यांचा अधिनियमातील कलम २ (ज) मधील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नसल्यामुळे व अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांना माहिती अधिका अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नसल्यामुळे मूळ अर्जदार श्री.ज्ञानोबा प्रभाकरा

कदम यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी दि.२२.०९.२०१४ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन अपिलार्थी यांचे विचाराधीन अपील मान्य करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील क्र.३५८८/२०१४ मान्य करण्यात येत आहे.

(दी. बा. देशपांडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद.

औरंगाबाद
दिनांक १५-०१-२०१५

प्रमाणित साक्षांकीत प्रत

(द. रा. कहार)
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, परभणी
२. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, मानवत, जि.परभणी
३. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, ताडकळस, ता.जि.परभणी
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पार्थी, जि.परभणी
५. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सोनपेठ, जि.परभणी
६. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पालम, जि.परभणी
७. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगाखेड, जि.परभणी
८. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा, जि.परभणी
९. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू, जि.परभणी
१०. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, जिंतूर, जि.परभणी
११. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
१२. निर्णय नस्ती.